# शिवाजी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना होमिओपॅथिक औषध वाटप

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थ्यांना डॉ. हिंमतसिंह शिंदे व डॉ. रूपाली शिंदे यांच्याकडून आर्सेनिक अल्बम ३० सी.एच. हे होमिओपॅथिक औषध वाटप करण्यात आले. यासाठी शिवाजी विद्यापीठ सेवक संघाने पुढाकार घेतला. सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, डॉ. हिंमतसिंह शिंदे, डॉ. रूपाली शिंदे, डॉ. विनिता रानडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या औषधाचे वाटप करण्यात आले.

लोकमत

# विद्यापीठ परीक्षांबाबत पर्याय पडताळण्याचे निर्देश


## मुख्यमंत्र्यांकडून आढावा । नव्या शिक्षण पद्धतीबाबत संशोधन होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : एकाही विद्यार्थ्याला विषाणूचा प्रादुर्भाव होणार नाही. याची काळजी घेऊन विद्यापीठांच्या परीक्षा घ्या. त्यासाठी नेमकी परीक्षापद्धती आणि वेळापत्रक निश्चित करण्यासाठी विविध पर्याय पडताळून पाहवेत, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी दिले.

विद्यापीठांच्या परीक्षा तसेच शैक्षणिक वर्षाबाबत मुख्यमंत्री ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंसमवेत व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठक झाली. या बैठकीत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, मुख्य सचिव अजोय मेहता, विभागाचे सचिव सौरभ विजय, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. अभय वाघ आदी सहभागी झाले.

अंतिम वर्षासाठी सर्व वर्षांच्या सत्रांच्या सरासरी इतके गुण किंवा श्रेणी प्रदान करण्याची तसेच श्रेणी सुधारासाठी ऐच्छिक परीक्षेचा पर्याय देण्याबाबत कायदेशीर बाबी तपासून पाहण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली. कोरोनाच्या संकटाला संधी मानून महाराष्ट्रातील प्राथमिक ते उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यातील प्रादेशिक विषमता संपविण्यासाठी प्रयत्न करण्याचे, नव्या शिक्षण पद्धतीबाबत संशोधन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.



**मंत्री उदय सामंत,** यांनी परीक्षा वेळेत घेण्यासाठी सुरु असलेल्या नियोजनाची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचाही विचार करुन अंतिम निर्णय जाहीर केला जाईल. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही, याचीदेखील काळजी घेतली जाईल.

**कोविड-१९च्या** अनुषंगाने विद्यापीठीय परीक्षांबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर यांनीही काही सूचना मांडल्या.

मुख्यमंत्री म्हणाले, जुलैमध्ये परीक्षा शक्य नाही, हे स्पष्ट होऊ लागले आहे. केरळ आणि गोवा राज्यातील परिस्थितीही आटोक्यात आली असे म्हणता म्हणता बदलली आहे. आपल्याकडे मुंबई, पुणे आणि औरंगाबादची परस्थितीही सतत बदलत आहे. त्यामुळे या संकटाचे संधीत रुपांतर करता येईल का? त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करता येईल का याचा विचार करायला हवा.

पुढारी

# विद्यापीठ परीक्षांचा दोन दिवसांत निर्णय

## पर्याय तपासून विद्यार्थ्यांची चिंता संपवा : मुख्यमंत्री

- कुलगुरूंसमवेत व्ही.सी.द्वारे चर्चा
- नव्या शिक्षण पद्धतीवर संशोधन करण्याचे आवाहन

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव एकाही विद्यार्थ्याला होणार नाही, याची काळजी घेऊनच विद्यापीठांच्या परीक्षा घेण्यासाठी नेमकी परीक्षा पद्धत आणि वेळापत्रक निश्चित करून विविध पर्याय पडताळून पाहण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी दिले. सर्व वर्षांच्या सत्रांच्या सरासरी इतके गुण किंवा श्रेणी प्रदान करण्याबरोबरच श्रेणी सुधारासाठी विद्यार्थ्यांना ऐच्छिक परीक्षेचा पर्याय देण्याबाबत कायदेशीर बाबी तपासून पाहण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे. यासंदर्भात येत्या दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

विद्यापीठांच्या पान ४ वर ▶

पुढारी

# विद्यापीठ परीक्षांचा दोन दिवसांत निर्णय

**(पान १ वरून)** अंतिम वर्षांच्या परीक्षा तसेच शैक्षणिक वर्षांबाबत सध्या अनिश्चिततेमुळे लाखो विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. यासंदर्भात आज मुख्यमंत्र्यांनी राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा केली.या कुलगुरूंसह उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, मुख्य सचिव अजोय मेहता, विभागाचे सचिव सौरभ विजय, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. अभय वाघ आदींनी या कॉन्फरन्समध्ये सहभाग घेतला.

कोरोनाच्या संकटामुळे येत्या जुलैमध्ये परीक्षा होणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. शैक्षणिक वर्ष कधीपासून सुरू करायचे, याबाबतही विविध प्रस्ताव तयार केले जात आहेत. मात्र, आता परीक्षांबाबतची अनिश्चितता संपविण्यासाठी नियोजन करण्याची गरज मुख्यमंत्री ठाकरे यांनी स्पष्ट केली. एकाही विद्यार्थ्याला प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घेऊन परीक्षा घेतली जाईल. मात्र, सरासरी गुण किंवा श्रेणी आणि रोजगार किंवा उच्च शिक्षणासाठी किंवा पुढील प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या गुण/श्रेणी मिळविण्यासाठी परीक्षा देण्याची ऐच्छिक सुविधा यासह विविध पर्याय कसे अंमलात आणता येतील, यावर विचार करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली.

कोरोनाच्या संकटाला संधी मानून महाराष्ट्रातील प्राथमिक ते उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यातील प्रादेशिक विषमता संपविण्यासाठी प्रयत्न करण्याचे, नव्या शिक्षण पद्धतीबाबत संशोधन करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

परदेशातील विद्यापीठांच्या शिक्षण पद्धतींचा अभ्यास करून त्या शिक्षण पद्धती आपल्याकडे कशा आणता येतील, यासाठी प्रयत्न करावे लागतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी केले.आरोग्य सुविधांबरोबरच शिक्षणाकडेही जीवनावश्यक म्हणून पाहताना महाराष्ट्रात सर्वत्र शिक्षणाचा दर्जा समान ठेवताना शिक्षण सुलभ कसे करता आले पाहिजे, यावर जोर द्यावा लागेल. ग्रामीण भागातील गुणी विद्यार्थ्यांवर परिस्थितीमुळे अन्याय होणार नाही याची काळजी घ्यायला हवी, असेही ठाकरे म्हणाले.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी परीक्षा वेळेत घेण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची आणि नियोजनाची माहिती दिली.

पुढारी

# ज्येष्ठ लेखिका अनुराधा गुरव यांचे निधन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



येथील प्रसिद्ध लेखिका, कवयित्री प्राचार्या अनुराधा कृष्णराव गुरव (वय ७९, रा. नाळे कॉलनी) यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी देहदान केले.

त्यांचा जन्म बाळे (जि. सोलापूर) येथे झाला. शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागाच्या प्रमुख म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. त्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील डी. एड. महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून सेवा बजावली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विभागीय संचालक म्हणूनही त्यांनी काम केले होते. वैवाहिक व शैक्षणिक समुपदेशनाचे कामही त्या करत होत्या. त्यांचे ३० कथासंग्रह, १३ कादंबऱ्या, एकांकिका संग्रह, बालसाहित्याची ३० पुस्तके, नवसाक्षर साहित्याची ४३ पुस्तके, शैक्षणिक १२ पुस्तके, लेखसंग्रह १६ पुस्तके असे विपुल साहित्य प्रकाशित झाले आहे.

विविध सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक संस्थांवर अध्यक्षा आणि सदस्य म्हणून त्या कार्यरत होत्या. त्यांना साहित्यिक आणि शैक्षणिक असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले. त्यांच्या मागे मुलगा डॉ. आशिष, मुलगी डॉ. तृप्ती, बहीण डॉ. लीला पाटील, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# परीक्षांची अनिश्चितता संपणार

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

- पर्यायांची पडताळणी करून चिंता संपविण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- सरासरी गुण किंवा श्रेणी प्रदान करण्याच्या पर्यायाची चाचपणी
- श्रेणी सुधारासाठी ऐच्छिक परीक्षेचा विचार

एकाही विद्यार्थ्याला विषाणूचा प्रादुर्भाव होणार नाही, याची काळजी घेऊन विद्यापीठांच्या परीक्षा घेण्यात याव्यात. त्यासाठी नेमकी परीक्षापद्धती आणि वेळापत्रक निश्चित करून विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील चिंता संपविली पाहिजे. त्यादृष्टीने विविध पर्याय पडताळून पाहण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी दिले. अंतिम वर्षासाठी सर्व वर्षांच्या सत्रांच्या सरासरीइतके गुण किंवा श्रेणी प्रदान करण्याची तसेच श्रेणी सुधारासाठी ऐच्छिक परीक्षेचा पर्याय देण्याबाबत कायदेशीर बाबी तपासून पाहण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली.

विद्यापीठांच्या परीक्षा तसेच शैक्षणिक वर्षांबाबत ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक पार पडली. मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले, 'करोना संकटामुळे सगळ्याच गोष्टी पुढे गेल्या आहेत. अगदी आर्थिक वर्ष पुढे गेले आहे. त्यामुळे आगामी शैक्षणिक वर्ष कधीपासून सुरू करायचे याबाबतही विविध प्रस्ताव तयार केले जात आहेत. पण आता परीक्षांबाबत अनिश्चितता संपविण्याचा विषय प्राधान्याने हाताळावा लागणार आहे. राज्यातील विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील परीक्षेच्या अनिश्चिततेची भीती संपविण्याच्या दृष्टीने नियोजन करावे लागणार आहे. जुलैमध्ये परीक्षा शक्य नाही, हे स्पष्ट होऊ लागले आहे. केरळ आणि गोवा राज्यातील परिस्थितीही आटोक्यात आली, असे म्हणता म्हणता बदलली आहे. आपल्याकडे मुंबई, पुणे आणि औरंगाबादची परिस्थितीही सतत बदलत आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत विचार करायला हवा.'

# प्रसिद्ध लेखिका अनुराधा गुरव यांचे निधन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

प्रसिद्ध लेखिका, कवयित्री प्राचार्य अनुराधा कृष्णराव गुरव (वय ७९) यांचे दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. इच्छेनुसार त्यांचे देहदान करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागाच्या प्रमुख म्हणून त्यांनी दीर्घ काळ काम केले. त्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेच्या डी. एड. महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून सेवा बजावली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विभागीय संचालक म्हणूनही त्यांनी काम केले होते. वैवाहिक व शैक्षणिक समुपदेशानाचे कामही त्या करत होत्या.

गुरव यांच्या ३० कथासंग्रह, १३ कादंबऱ्या, एकांकिका संग्रह, बालसाहित्याची ३० पुस्तके, नवसाक्षर साहित्याची ४३ पुस्तके, शैक्षणिक १२ पुस्तके, लेखसंग्रह १६ पुस्तके असे



अनुराधा गुरव

विपुल साहित्य प्रकाशित झाले आहे. विविध सामाजिक-साहित्यिक-शैक्षणिक संस्थांवर अध्यक्षा आणि सदस्य म्हणून त्या कार्यरत होत्या. त्यांना साहित्यिक आणि शैक्षणिक असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते. २०१७ मध्ये विविध संस्थांतर्फे त्यांचा अमृतमहोत्सवी सत्कार झाला होता. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते 'प्रा. अनुराधा गुरव व्यक्ती आणि वांङमय' या नावाचा गौरव ग्रंथही प्रकराशित झाला होता.

त्यांच्या मागे मुलगा डॉ. आशिष, मुलगी डॉ. तृप्ती, बहीण डॉ. लीला पाटील, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# Voluntary exams for final year students?

The state government on Saturday decided to explore two options for final year college students -- passing the final year by taking the average of marks obtained in all previous semesters or appear for the final exams in case they are not happy with the average marks.

"However, these options are under scrutiny and will be discussed with the law department before a final call is taken," said chief minister Uddhav Thackeray during a video conference with vice-chancellors of the state universities on Saturday. P3

# Govt considers voluntary exam option for final-year students

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** State government on Saturday decided to explore two options for final year college students — passing the final year by taking the average of marks obtained in all previous semesters or appear for the final examination in case they are not happy with the average marks.

Both these options are under scrutiny and will be discussed with the law department before a final call is taken, said chief minister Uddhav Thackeray during a video conference meeting with vice-chancellors of the universities on Saturday.

He said that uncertainty over examination needs to end to put the minds of students and parents at rest. He said that looking at the spread of Covid-19 infection in the state, it is becoming clear that conducting exams in July seems impossible.

"We all gave our opinion on the issue during the meeting. There were alternatives discussed by the chief minister. Based on the legal department advice a decision will be announced by the government in two days," said Murlidhar Chandekar, vice chancellor of Amravati University and also officiating VC of Nagpur University.

Thackeray in a statement issued later said that whatever form of examination is chosen, care needs to be taken that not even a single student is affected by Covid-19.

An official who attended the meeting but did not wish to be named, said, "One of the bureaucrats present in the meeting came up with an important point. He said that for many students, education is the only way to come up in life and examinations play an important role. Maybe this percentage is just 20% of total students, but we need to give them the opportunity to score well. For them, there should be an option of examinations while for the remaining 80%, if they do not wish to appear for exams, then average marks or other ways can be considered."